माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००२६**

**अपिलार्थी श्री. आशिष प्रभुदेसाई**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता एस व टी (इ.प्र) पू.उप**
उप प्रमुख अभियंता (इमारत व प्रस्ताव) पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,
राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी, (प.), मुंबई-८३

**प्रथम अपिलीय अधिकारी**
उप प्रमुख अभियंता (इमारत व प्रस्ताव) पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,
राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,
लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी, (प.), मुंबई-८३

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.१०.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०३.२०२५ | ३०.०४.२०२५ | ०९.०७.२०२५ | २५.०९.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २२.१२.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती दिलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ३०.०४.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २५.०९.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २७.०३.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार नस्ती क्र. CE/४६०३/AT ची संपूर्ण प्रत देऊन मुळ नस्ती निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती.

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.०४.२०२५ रोजी अपिलार्थींना कळविले की, *With reference to above, as per R.A. (B.P.) E.S.'s remarks, file No. CE/4603/AT as mentioned by your application scanned copy of the file is available in this office. You can take scanned copy on your pendrive from this office.*

३. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०९.०७.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०९.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या ७ दिवसांत सदर धारिकेची मुळ प्रत उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केले.

४. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर सदर नस्ती सापडली नसल्याने दि. ०८.१०.२०२५ रोजी अपिलार्थींना त्याप्रमाणे कळविले.

..२/-

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, नस्ती क्र. CE/४६०३/AT ची प्रत मागितल्याने स्कॅन कॉपी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, सदर स्कॅन कॉपीमध्ये अनेक दस्तावेज उपलब्ध नाही व काही दस्तावेजाची प्रत अस्पष्ट आहे. त्यांनी मुळ धारिकेची प्रत देण्याची विनंती केली. त्यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले की, मुळ धारिका उपलब्ध होत नाही.

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी पुन्हा शोध घेतला असता संबंधीत रेकॉर्ड लिपिकने लिहून दिले की, नस्ती उपलब्ध नाही.

७. आयोगाने विचारणा केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, नस्ती इमारत प्रस्ताव मान्यते विषयी आहे व सदर नस्ती कायमस्वरुपी जतन करण्यासारखी आहे.

८. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेखाचा पुन्हा शोध घ्यावा व सदर नस्ती कायमस्वरुपी जतन करावयाची असल्याने उपलब्ध होत नसेल तर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार संबंधीत पोलीस ठाणे येथे FIR नोंदवून FIR च्या प्रतीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission, Greater Mumbai

12-10-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १२.१०.२०२६**